CMYK

३४वा सामना

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु वि. पंजाब किंग्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : बंगळुरू

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ४२.८

किमान तपमान २७.०

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. १८ एप्रिल २०२५ । ▸ वर्ष : २३ वे ▸ अंक : १९९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

# कडलास गावातील महिलेचा खून की आत्महत्या?

✔ सांगोला/प्रतिनिधी

तालुक्यातील कडलास या गावात गुरूवारी सकाळी एका महिलेचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळला. पोलिसांनी घटनास्थळी येवून पंचनामा केल्यानंतर त्या महिलेल्च्या डोक्यातून रक्त वाहात असल्याचे दिसून आले. त्यामुळे या महिलेने खरीच आत्महत्या केली की तिचा खून करून तिच्या गळ्याला फास लावला याविषयी पोलीस संभ्रमात आहेत. याबाबत फिर्याद देण्यास तिचा एकही नातेवाईक पुढे न आल्याने पोलिसांचा संशय घरातल्याच व्यक्तीवर बळावला आहे. रतन शहाजी साळुंखे वय ५० असे या या महिलेचे नाव आहे.



सांगोला : तालुक्यातील कडलास येथे मृत अवस्थेत आढळलेली महिला.

## पोलिसांचा घरातल्या लोकांवर संशय

याबाबत कडलासचे पोलीस पाटील रघुनाथ ननवरे यांनी पोलीस ठाण्याला लेखी खबर दिली आहे. ननवरे यांनी पोलीस स्टेशनला दिलेली माहिती अशी की, कडलास गावचे सरपंच दिगंबर भजनावळे यांचा आपल्याला फोन आला. बौद्ध समाज मंदिराच्या छतावर एका महिलेने गळफास घेतल्याचे सरपंचांनी सांगितले. त्यांच्या सांगण्यावरून आपण त्या ठिकाणी जावून पहाणी केली. कडलास गावातील रतन शहाजी साळुंखे वय ५० ही महिला असल्याचे आपण ओळखले. त्यानंतर मी स्वतः सांगोला पोलीस स्टेशनला कळविले व दुपारी अडीच वाजता ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी त्या महिलेला पाठवण्यात आले तेथील वैद्यकिय अधिकारी यांनी उपचारापूर्वीच मयत झाल्याचे सांगोला पोलीस स्टेशनला कळविले.

सदर महिलेने आत्महत्याा केली का तिचा खून झाला याबाबत चर्चा असून पोलिसांनी तपासासाठी श्वान पथक म ागविले होते मंगळवेढा पोलीस विभागीय कार्यालयातील उपविभागीय अधिकारी विक्रम गायकवाड यांनी घटनास्थळी भेट दिली. तपास चालू असून रात्री नऊ वाजेपर्यंत खून का आत्महत्याा याबाबत पोलिसांकडून कोणतीही माहिती मिळाली नाही.घरातल्या काही लोकांवरच पोलिसांचा संशय असल्याचे सांगण्यात आले.त्यादृष्टीने पोलिसांचा तपास सुरु आहे.

### गळफास घेतल्यास रक्तस्त्राव कसा?

त्या महिलेल्या गळ्याला वायरचा फास होता मात्र तिच्या डोक्यातून रक्तस्त्राव झालेला होता.तिने खरेच गळफास घेतली असेल तर रक्तस्त्राव होण्याचे कारणच नाही.तिला मारहाण करून तिचा मृतदेह गळ्याला वायर लावून समाज मंदिराच्या अँगलला लटकावल्याचा पोलिसांचा अंदाज आहे.

### दुसऱ्या दिवशीही खुनाची घटना

सांगोला तालुक्यातील चिंचोली या गावात बुधवारी सकाळी लहान भावाने सख्ख्या मोठ्या भावाचा चाकूने भोसकून खून केला होता. गुरूवारी दुसऱ्या दिवशी याच तालुक्यात महिलेल्या खुनाची घटना घडली.

## मानसिक त्रासाला कंटाळून मुलाची आत्महत्या

### आई, वडिलांसह १३ जणांवर गुन्हा दाखल

✔ मोहोळ/प्रतिनिधी

शेतीच्या वादामुळे होत असलेल्या मानसिक त्रासाला कंटाळून आत्महत्या करत असल्याचा मेसेज टाकून एकाने आत्महत्या केली. याप्रकरणी आई, वडील, भावासह १३ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना १६ एप्रिल रोजी सकाळी साडेआठ वाजता अनगर (ता. मोहोळ) येथे घडली.

अनगर येथील सिद्धेश्वर सत्यवान गुंड (वय ३५) याने शेतीवरून वादावरुन होत असलेल्याला




मानसिक त्रासाला कंटाळून हे पाऊल टाकत आहे असे मेसेजद्वारे कळवून गळफास घेतला. याबाबत घरातील लोकांनी माझ्या जावयास आत्महत्येस प्रवृत्त केल्यामुळे आत्महत्या केली आहे अशा आशयाची फिर्याद सासरे शिवाजी सालगुडे (रा कुरणवाडी) यांनी मोहोळ पोलिस ठाण्यात दाखल केली आहे. त्यानुसार वडील सत्यवान गुंड, आई इंदू, भाऊ बळीराम गुंड, वहिनी बनिता चौधे (रा.अनगर, ता. मोहोळ), बहीण सुरेखा लटके, नंदवा अंकुश लटके (रा. अंजनगाव (खे), ता. माढा), भाऊ बळीराम वाचे, संतोष शेंबडे मावस सासु प्रमिला सगरे मामा हनुमंत पवार, ज्ञानदेव सरक चुलत भाऊ गजानन गुंड व दत्तात्रय मुहरा, चुलत बहीण रेणुका डोके या तेरा जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास पीएसआय करणेवाड करित आहेत

## माणिकरावांचे पंखच छाटले; बदल्यांचे अधिकार आयुक्तांना दिले

✔ सोलापूर/विशेष प्रतिनिधी

राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचे पंख छाटण्यात आले आहेत.कृषी खात्यातील क्लास-१ आणि क्लास-२ वर्गातील आणि इतर अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार कृषी मंत्र्यांकडून काढून घेत ते कृषी आयुक्तांना देण्यात आले आहेत. कोर्टाकडून झालेली शिक्षा आणि शेतकऱ्यांविषयी केलेले वादग्रस्त विधान यामुळे कोकाटे चांगलेच अडचणीत आले होते.न्यायालयाने दिलासा दिला आणि शेतकरीही ते विधान विसरून गेले आता मात्र नवे संकट त्यांच्यापुढे उभे ठाकले आहे.



महाराष्ट्राच्या कृषी विभागातील अधिकाऱ्यांच्या बदल्यांसदर्भात मोठा निर्णय घेण्यात आला आहे. कृषी मंत्र्यांकडे असणारे सर्व अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार आता आयुक्तांकडे देण्यात आले आहेत. यात क्लास १ क्लास २ च्या अधिकाऱ्यांचाही समावेश आहे. यासंदर्भातील सुधारित शासन निर्णय नुकताच समोर आला आहे. कृषी विभागात बदल्यांमुळे होणारा आर्थिक गैरव्यवहार थांबवावा आणि अधिकाऱ्यांना बदल्यांसाठी अधिकाराचे विकेंद्रीकरण आवश्यक असल्याचेही सांगितले जात होते. दरम्यान, गेल्या अनेक दिवसांपासून कोकाटे यांच्या वक्तव्यांमुळे राज्यात वाद वाढलेला असताना हा निर्णय समोर आल्याने चर्चा रंगली आहे.

### नक्की निर्णय काय?

राज्यातील कृषी विभागातील सर्वच बदल्या मंत्र्यांकडून नव्हे तर आयुक्तांकडून होणार आहे. महाराष्ट्राच्या कृषी विभागातील गट अ, ब, क व ड या चारही विभागातील कृषी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे अधिकार आता कृषी आयुक्तांकडे देण्यात आले आहेत. क्लास १ व क्लास २ च्या कृषी अधिकाऱ्यांचाही यात समावेश आहे. कृषी विभागात अधिकाऱ्यांच्या बदल्यांसाठी होणाऱ्या आर्थिक गैरव्यवहार थांबवण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयाने बदल्यांसाठी होणारे सत्तेचे विकेंद्रीकरण होत असल्याने या निर्णयाचे स्वागत केले जात आहे. या निर्णयाने कृषी विभागातील बदल्यांसंदर्भात होणाऱ्या राजकीय हस्तक्षेपाला नियंत्रण बसणार आहे. कृषी विभागात मागेल तिथे बदलीचे धोरण मंत्रालयातून चालत असल्याचा आरोप गेल्या अनेक दिवसांपासून होतो. मर्जीतील अधिकाऱ्यांच्या हव्या असलेल्या ठिकाणी बदल्यांच्या बदल्यात आर्थिक गैरव्यवहार होत असल्याचा आरोपही झाला. दरम्यान, आता बदल्यांसदर्भात मंत्रालयातून हालणारी सूत्रे आता आयुक्तांच्या हाती देण्यात आल्याचा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. बदल्यांसाठी २००५ मध्ये राज्यात स्वतंत्र कायदा अस्तित्वात आला आहे. सध्या या कायद्याला छेद देणारा जीआर काढला गेला आहे.

### चक्कर येऊन पडल्याने इसमाचा मृत्यू

✔ सोलापूर : लक्ष्मीनगर बाळे येथे चक्कर येऊन पडल्याने सदानंद प्रभाकर मानेगावकर (वय ३९ रा.) हे बेशुद्ध होऊन उपचारापूर्वी माहिती झाले. गुरुवारी सकाळी १० वाजेच्या सुमारात घरात असताना त्यांना अचानक चक्कर येऊन बेशुद्ध झाले होते. आनंद (भाऊ) यांनी त्वरित त्यांना शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या घटनेची नोंद फौजदार चावडी पोलिसात झाली आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आजवर अनेक टीम फिरलोय !

संगम श्री डे
178-62-156

संगम श्री नाईट
455-40-460

कल्याण
558-80-226

मुंबई
136-03-779

# दुष्मनी बाजूला...गळ्यात गळे...अन् हातात हात...‘दिल’से सब कुछ! समझोते, तडजोडी,तहांचा ‘सिलसिला’; और बहुत अंदर की बात!!

✔ सोलापूर/खास प्रतिनिधी

अनेक आघाड्यांवर राज्यात नावा रुपाला आलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कारभारी निवडीचा जोरदार हंगामा आता सुरु झाला आहे. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, पडद्याआड अन् पडद्यावर जे शिजले आहे, त्यापेक्षा शिजवले आहे, त्यावरुन बाजार समितीमधील सत्ता मिळविण्यात असे दडले तरी काय? असा प्रश्न बहुतांशजणांना पडला आहे. राजकीय कट्टर दुष्मनी बाजूला झाली, एकमेकांचे तोंड न बघणाऱ्यांनी मांडीला मांडी लावली. राजकारण ‘या’ हाताचे ‘त्या’ हाताला कळू न देणाऱ्यांनी एकमेकांचे हातात हात घेतले. समझोता, तडजोडी अन् तह असा सगळाच अट्टाहास झाला. यापूर्वी बाजार समिती निवडणुकीत कधीच एवढे शिजले नाही अन् शिजवले गेले नाही, स्वार्थी राजकारणाच्या सगळ्या सगळ्या मर्यादा ओलांडून तुझ्या गळा...माझ्या गळा गुंफू बाजार समितीमधील सत्तेच्या माळा...’ असा सूर आळवत निवडणुकीचा आखाडा तयार केला आहे. त्यातून बाजार समितीच्या निवडणुकीला खूप महत्त्व आले आणि अनपेक्षित वळणावर ही निवडणूक गेली गेली आहे.



### हे फक्त राहिले बघायचे; एक मोहरा आखाड्यात दुसरा मैदानाबाहेर...

आमदार सुभाष देशमुख आणि माजी आमदार दिलीप माने या दोघांच्या राजकीय वारसदारांची एंट्री बाजार समितीत दमदारपणे होईल, असे अपेक्षित होते, त्या पार्श्वभूमीवर खूप हालचाली झाल्या होत्या. मात्र, दिलीप माने यांनी चिरंजीव पृथ्वीराज माने यांचा बाजार समितीच्या दिशेने उधळणारा अश्व रोखला, बहुधा त्यांना तो जिल्हा परिषद अन् पंचायत समितीच्या निवडणुकीत उधळवायचा असेल पण दुसरीकडे सुभाष देशमुख यांनी चिरंजीव मनिष देशमुख यांचा अश्व बाजार समितीत ग्रामपंचायत मतदार संघातून सज्ज केला.





### देशमुखशाहीला आव्हान देत कल्याणशेट्टींच्या ‘सचिनां’ची जोरसे बल्लेबाजीची तयारी

अत्यंत अनेपेक्षित वळणावर गेलेली गेलेली सोलापूर बाजार समितीची निवडणूक चांगलीच रंगतदार आणि घासून होण्याचे संकेत आहेत. दोन्ही पॅनेल मोठी ताकद या निवडणुकीत लावतील हे निश्चितच आहे. पण भाजपचे आपल्याच पक्षाचे आमदार विजयकुमार देशमुख आणि आमदार सुभाष देशमुख या देशमुखशाही आमदारांना आव्हान देत काँग्रेससह अन्य जणांना सोबत घेऊन सर्वपक्षीय आघाडीचे पॅनल करीत भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी निवडणुकीचे मैदान मारण्यासाठी दमदार बॅटिंग करण्याची सज्जता ठेवली आहे. दिलीप माने, सुरेश हसापुरे, राजशेखर शिवदारे, इंदुमती अलगोंड-पाटील, अविनाश मार्तंडे, गणेश वानकर, सुनील शेळके आदी दमदार खेळाडूंना त्यांनी आपल्या पॅनलमध्ये घेत सर्वपक्षीय आघाडीचा तगडा पॅनल केला आहे.




धूमशान बाजार समितीच्या निवडणुकीचं!

### ● सत्तेच्या सिंहासनासाठी ‘न भूतो न भविष्यती’च्या घडमोडी
### ● खूप काही शिजवले, खूप काही दिसेल वेगळं वेगळं

### चक्क देवाभाऊंना ढाक लावण्याचे देशमुख आमदारांचे धाडस तरी कसे?



सोलापूर बाजार समितीची निवडणूक काँग्रेसह सर्वपक्षीय महाविकास आघाडी करुन लढण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पक्षाचे जिल्हाध्यक्ष म्हणून शिवाय निष्ठावंत आणि निकटवर्तीय विश्वासू आमदार म्हणून सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडे दिले. गॉडफादार फडणवीस यांचे हे निर्देश दोघे देशमुख आमदार मानतील हे अपेक्षित होते. मात्र घडले वेगळेच या दोघांनी कल्याणशेट्टींच्या भूमिकेला विरोध करत निवडणुकीसाठी पॅनल उभे केले. वास्तविक कल्याणशेट्टींची या निवडणुकीसंबंधीची भूमिका किंवा विचार हा मुख्यमंत्री फडणवीस यांचाच विचार. तरीपण देशमुखशाही आमदारांनी जणू काही फडणवीस यांनाच ढाक लावून निवडणुकीचा वेगळा विचार कृतीत आणल्याचे स्पष्ट होते.

### दोघांची अपरिहार्यता, बापू अन् काका... मामा भांजे यांची पुन्हा गाठ

वास्तविक पाहता आमदार सुभाष देशमुख आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष बळीराम साठे हे नात्याने एकमेकांचे मामा भाचे आहेत. मात्र, दोघांमध्ये मागच्या अनेक वर्षांपासून तसं सख्य अजिबात नाही.दोघांचे पक्ष, दोघांचे राजकारण, दोघांचे वर्तुळ, दोघांचे विचार, दोघांची कृती हे सगळं सगळं भिन्न आणि वेगळं आहे. मात्र सोलापूर बाजार समितीच्या निवडणुकीत सगळंच काही वेगळं चित्र निर्माण झाले. सचिन कल्याणशेट्टी, दिलीप माने, सुरेश हसापुरे आदींनी घेतलेल्या वेगळ्या भूमिकेमुळे सुभाष देशमुख आणि बळीराम साठे यांची अपरिहार्यता झाली. दोघांनादेखील एकमेकांची गरज पडली. दोघांनी एकत्र येण्याशिवाय दुसरा पर्यायच राहिला नाही. त्यामुळे मामा आणि भांजे यांनी ओळखून घेऊन बाजार समितीच्या निवडणुकीत सोंगट्या टाकल्या.



(उर्वरित पान ५)

CMYK